# संशोधकांचे उद्योजक होण्यासाठी...

**पुणे, २१ जुलै / प्रतिनिधी**

विज्ञान क्षेत्रातील संशोधक आणि कल्पक व्यक्तींनी केवळ कल्पना मांडून थांबता कामा नये, आपल्या अभ्यासाच्या जोरावर ते स्वत:च उद्योजक बनावेत यासाठी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) प्रयत्न करणार असून, त्यासाठी 'व्हेंचर सेंटर' ही कंपनी स्थापन करण्यात येत आहे.

ही कंपनी येत्या दीड महिन्याच्या काळात स्थापन करण्यात येणार आहे. ती एनसीएलच्या आवारात कार्यरत असेल. ही कंपनी उभी राहावी यासाठी केंद्र सरकारतर्फे पहिल्या पाच वर्षांसाठी एकूण साडेतीन कोटी रुपयांची मदत करण्यात येणार आहे. त्यानंतर मात्र कंपनी स्वत:च्या पायावर उभी राहिली, तर पुढे तिचे अस्तित्व कायम राहील. विज्ञानक्षेत्रात देशात करण्यात येत असलेला हा अशाप्रकारचा पहिलाच प्रकल्प आहे. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचा त्याला पाठिंबा राहील, अशी माहिती एनसीएलचे संचालक डॉ. एस. शिवराम यांनी पत्रकारांना दिली.

शास्त्रज्ञ व संशोधकांना उद्योग सुरू करून देण्यासाठी एनसीएलने हा पुढाकार घेतला आहे. संशोधन करणारा कोणाकडे नोकरी करणार, असा प्रश्न आता विचारला जातो, पण 'व्हेंचर सेंटर' अस्तित्वात आल्यानंतर हेच शास्त्रज्ञ इतरांना नोकरीवर ठेवू शकतील. नवे संशोधन करणारे शास्त्रज्ञ किंवा नव्या कल्पना घेऊन येणाऱ्याला त्यावर आधारित एखादे उत्पादन बनविण्यासाठी ही कंपनी आवश्यक सुविधा पुरवेल. तसेच, या उत्पादनाचे मूल्यमापन एनसीएलकडून होणार असल्याने या उद्योजकाला एखादा प्रकल्प उभारणासाठी बँकाही वित्तपुरठा करतील. विज्ञान संशोधकाला अशी मदत करणारा हा पहिलाच प्रयत्न आहे. येत्या पाच वर्षांत असे किमान दहा उद्योग उभे करण्याची 'व्हेंचर सेंटर'ची योजना आहे. अभियांत्रिकी विषयातील संशोधनासाठी अशी मदत करणाऱ्या संस्था आहेत. मुंबई-आयआयटी व दिल्ली-आयआयटीमार्फत संशोधकांना अशी मदत झालेली आहे, असे डॉ. शिवराम यांनी सांगितले.

**'मॉलेक्यूल लायब्ररी' तयार करणार**

एनसीएलमध्ये होणाऱ्या संशोधनाच्या दरम्यान दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारचे तीन हजार 'मॉलेक्यूल' तयार केले जातात. ही माहिती आता जतन करण्याची योजना असून, त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. हे मॉलेक्यूल आणि त्यांच्या संयुगांचा भविष्यात औषध निर्मितीसारख्या विविध कारणांसाठी उपयोग करणे शक्य आहे. त्यामुळे एनसीएलला आर्थिक लाभही होईल. ■